# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक १७/११/२०१८

## सभा सुचना क्रं. १२ स. ११.३० वा.

| अु क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | **वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सेंटिनल सेंटर्स स्थापना करण्याबाबत व त्याकरीता आवश्यक साहीत्य मिळण्याबाबत.** | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सेंटिनल सेंटर्स स्थापना करण्याबाबत व त्याकरीता आवश्यक साहीत्य मिळण्याबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महानगरपालिकेची २१ नागरी आरोग्य केंद्र, ३ माताबाल संगोपन केंद्र, २ हॉस्पिटल व ९ ओपीडी असून कार्यक्षेत्रातील वाढती लोकसंख्या व डेंग्यू रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता डेंग्यू रुग्णाचे निश्चित निदान वेळेत होणेकरीता सेंटीनल सेंटर्स ची स्थापना करणे आवश्यक आहे. याबाबत मा. वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती सभा दि.०२/११/२०१८ रोजीने केलेल्या शिफारशीनुसार सेंटीनल सेंटर्स चालू करण्याकरिता १) ELISA READER 2) ELISA WASHER मशिन व त्याकरीता लागणारे साहित्य खरेदी करणे आवश्यक असुन याकरीता अंदाजे रु.३,००,०००/- इतका खर्च अपेक्षित असून याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अतुल साळुंखे सूचक :- मा.श्रीम. विद्या पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर.डी.एम. पेटीट रुग्णालयातील रक्त संचयन विभागातील वैद्यकीय उपकरणांची त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणेबाबतच्या प्रस्तावाला मंजूरी मिळणेबाबत.** | ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर.डी.एम.पेटीट रुग्णालयातील रक्त संचयन विभागातील वैद्यकीय उपकरणांची त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणेबाबतच्या प्रस्तावाला मंजूरी मिळणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, रक्त साठवणी विभाग दि.२६/०३/२०१७ पासून सर डी. एम. पेटीट विभागात चालू झाल्यापासून रक्त संक्रमण विभागाकडून किती युनिट रक्त व रक्तघटकाचा पुरवठा करण्यात आला, नसल्यास पत्रव्यवहार झाल्याबाबतची छायांकित प्रत व तत्पूर्वी त्यांच्याबरोबर करण्यात आलेल्या करारनाम्याची प्रत इ. अद्ययावत माहिती सादर करावी. तुर्त सदरचा प्रस्ताव तहकुब करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज ठाकूर सूचक :- मा.श्री.उमेश नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३. | **वसई विरार शहर महानगरपालिकेची रुग्णालये व नव्याने सुरु केलेल्या माताबाल संगोपन केंद्र, जुचंद्र येथे वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी नियुक्त** | ठराव :-वसई विरार शहर महानगरपालिकेची रुग्णालये व नव्याने सुरु केलेल्या माताबाल संगोपन केंद्र, जुचंद्र येथे वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी नियुक्त करण्यांत आलेल्या मानद तत्वावरील डॉक्टरांना कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महानगरपालिकेची रुग्णालये व नव्याने सुरु केलेले जुचंद्र येथिल माताबाल संगोपन केंद्रास मा. आयुक्त कार्यालय यांची दि.०४/०९/२०१८ रोजीची मंजूर टिपणीच्या अनुषंगाने महानगरपालिकेची रुग्णालये येथे आवश्यकतेनुसार व नव्याने सुरु |

| | | |
|---|---|---|
| | करण्यांत आलेल्या मानद तत्वावरील डॉक्टरांना कार्योतर मंजूरी मिळणेबाबत. | केलेले माताबाल संगोपन केंद्र, जुचंद्र येथे वैद्यकीय सेवेची अत्यावश्यक बाब लक्षात घेता मानद तत्वावर तज्ञ डॉक्टर्स यांची तातडीने नेमणूक करणे आवश्यक असल्याने मा. वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती व मा. स्थायी समितीच्या पूर्व मंजूरीने सदर डॉक्टरांना दि.०४/०९/२०१८ व दि. १४/०९/२०१८ पासून नियुक्त केलेले डॉ. सुशेन चव्हाण, एम.बी.बी.एस.,डी.सी.एच. सी.पी.एस, डॉ. भक्ती तळेकर, एम.बी.बी.एस., एम.डी., डि.जी.ओ. सी.पी.एस, डॉ. संध्या डे, एम.बी.बी.एस., एम.डी (रेडिओ डायग्नोसिस), डॉ. राहुल पाटील, एम.बी.बी.एस., डि.जी.ओ. सी.पी.एस डि.एन.बी. (ऑब्स्ट ॲन्ड गायनॅक), डॉ. अनिता झा, एम.बी.बी.एस., एम.एस (ऑब्स्ट ॲन्ड गायनॅक), डॉ. सुशांक पटेल, एम.बी.बी.एस., डी.सी.एच. सी.पी.एस, डॉ. कान्त शाह, एम.बी.बी.एस., डी.एन.बी (पेडट्रीक सर्जरी), डॉ. कन्हैया बोरिसा, एम.बी.बी.एस.,एम.डी. (जनरल मेडिसीन), डॉ. लोचन पाटील, एम.बी.बी.एस., डी.एम.आर.ई.सी.पी.एस यांना मा. सर्वसाधारण सभा दि. ११/०२/२०१४ ठराव क्र.१८ अन्वये निश्चित करण्यांत आलेले मासिक मानधन रु.२,५००/- इतके व त्यांनी केलेल्या कामाची होणारी आंतररुग्ण तपासणी फी, शस्त्रक्रिया फी मा. सर्वसाधारण सभा दि.१६/०२/२०१५ ठराव क्र.२६ व मा. महासभा दि. १६/०४/२०१५ ठराव क्र.२९ व महानगरपालिकेच्या विजयनगर-तुळींज रुग्णालयाच्या आय.सी.यु, डायलेसिस व सोनोग्राफी इ. विभागाचे दर मा. महासभा दि.१८/११/२०१६ ठराव क्र.१३ अन्वये निश्चित केल्याप्रमाणे अदा करुन महानगरपालिकेच्या रुग्णालयात/माताबाल संगोपन केंद्रात वैद्यकीय सेवा पुरविण्याकामी नियुक्त करणेस व भविष्यात मानद तत्वावर नियुक्त करण्यांत आलेले वरील तज्ञ डॉक्टर्स काही कालावधीनंतर महानगरपालिकेची रुग्णालये/माताबाल संगोपन केंद्र येथे वैद्यकीय सेवा देऊ शकले नाही तर त्यांचे रिक्त जागी त्या ठिकाणी नविन तज्ञ डॉक्टर्स यांची मानद तत्वावर नियुक्ती करण्यांत येईल. सबब मा. वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती सभा दि.०२/११/२०१८ रोजीने केलेल्या शिफारशीनुसार सदरकामी नियुक्त करण्यांत आलेल्या विविध विषयांचे ९ तज्ञ डॉक्टर्स यांना मासिक मानधन रु.२,५००/- व त्यांनी केलेल्या कामाची होणारी आंतररुग्ण तपासणी फी, शस्त्रक्रिया फी अदा करणेकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अतुल साळुंखे सूचक :- मा.श्री.किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ४. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विजयनगर - तुळींज रुग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर तज्ञ डॉक्टर नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत. | ठराव :-वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विजयनगर-तुळींज रुग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर तज्ञ डॉक्टर नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महानगरपालिकेच्या विजयनगर-तुळींज रुग्णालयात मानद तत्वावर तज्ञ डॉक्टर उपलब्ध होणार असुन रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांना फायदा होणार असल्याने याकामी डॉ. आदित्य वाळिंजकर, एम.बी.बी.एस., डी.डी.वी व डॉ. जागृती पाटील, बॅचलर ऑफ फिजिओथेरेपी यांना महानगरपालिका रुग्णालयात मानद तत्वावर नियुक्त करणेस मा. वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती सभा दि.०२/११/२०१८ रोजीने केलेल्या शिफारशीनुसार तसेच महानगरपालिकेने मा. सर्वसाधारण सभा दि.११/०२/२०१४ ठराव क्र.१८ अन्वये निश्चित केलेनुसार दरमहा रु.२,५००/- इतके मानधन व त्यांनी केलेल्या कामाची होणारी आंतररुग्ण तपासणी फी मा. सर्वसाधारण सभा दि.१६/०२/२०१५ ठराव क्र.२६ व मा. महासभा दि.१६/०४/२०१५ ठराव क्र.२९ अन्वये निश्चित केलेल्या दरानुसार अदा करणेकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| ५. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत सोनोग्राफी,एक्स-रे,एम.आर.आय., सिटी स्कॅन संलग्नीकरणाद्वारे उपलब्ध करुन अनुभवी संस्थाकडून अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) मागविणेसाठी मंजुरी मिळणेबाबत.** | ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत सोनोग्राफी, एक्स-रे, एम.आर.आय., सिटी स्कॅन संलग्नीकरणाद्वारे उपलब्ध करुन अनुभवी संस्थाकडुन अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) मागविणेसाठी मंजुरी मिळणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महानगरपालिकेच्या रुग्णालयात विविध विभागात सेवा घेणाऱ्या रुग्णांना तातडीच्या प्रसंगी एम.आर.आय., सिटी स्कॅन, २ डी ईको तसेच इतर प्रयोगशाळा सेवा (महानगरपालिका यंत्रणेत उपलब्ध नसलेल्या) व एक्स-रे, सोनोग्राफी सेवा (महानगरपालिका यंत्रणेत उपलब्ध नसलेल्या) उपलब्ध करुन देणेकामी इतरत्र खाजगी रुग्णालयात पाठवावे लागते. तसेच आर्थिक दृष्टया दुर्बल रुग्णांना खाजगी रुग्णालयातून उपचार घेणे अवघड असते. या सर्व बाबी अवलोकनी घेता रुग्णांच्या हिताकरीता महानगरपालिकेच्या रुग्णालयात सोनोग्राफी, एक्स-रे, एम.आर.आय., सिटी स्कॅन व पॅथॉलॉजी इ. सेवा महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरात नोंदणीकृत खाजगी रुग्णालय किंवा डायग्नोस्टिक सेंटर यांचेकडुन उपलब्ध करुन रुग्णालयात येणाऱ्या बाहयरुग्ण तसेच आंतररुग्ण वर्ग करुन याचा फायदा मोठया प्रमाणावर रुग्णांना होणार आहे. याबाबत मा. वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती सभा दि.०२/११/२०१८ रोजीने केलेल्या शिफारशीनुसार सदरकामी कुशल नामांकित व वैद्यकीय क्षेत्रात काम केलेल्या अनुभवी संस्थाकडुन अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) मागविण्यासाठी वृत्तपत्रात जाहीर प्रसिध्दी देऊन सदरची सेवा रुग्णालयात उपलब्ध करुन घेणेकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.किशोर पाटील सूचक :- मा.श्री.कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ६. | **बांधकाम विभागाकरिता ठेका अभियंता उपलब्ध करुन देणे बाबत.** | ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कंत्राटी पध्दतीवर प्रभाग समिती -ए, बोळींज व प्रभाग समिती -डी, नालासोपारा (पुर्व) येथे अनधिकृत बांधकाम व बांधकाम विभागातील कामे करण्यासाठी अतिरिक्त २ कंत्राटी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) यांना मंजूर ठेकेदारास कार्यादेश देणेकामी व सदरचे वेतनापोटी येणाऱ्या खर्चास आजची मा. स्थायी समिती सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री.किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ७. | **विधी विभागात प्रभाग निहाय कोर्ट लिपीक व सहा.विधी सल्लागार उपलब्ध करुन देणेबाबत.** | ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कंत्राटी पध्दतीवर अतिरिक्त ०२ विधी शाखेच्या पदवीधर उमेदवारांची मंजुर ठेकेदारा मार्फत सहा. विधी अधिकारी/कामगार अधिकारी म्हणून ठेके पध्दतीने नेमणूक करण्याबाबत मंजूर ठेकेदारास कार्यादेश देणेकामी व सदरचे वेतनापोटी येणाऱ्या खर्चास आजची मा. स्थायी समिती सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री.वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ८. | **एकात्मीक किटक निर्मुलन व्यवस्थापन कार्यक्रम राबविणेसाठी मागविण्यात आलेल्या Request for Proposal (RFP) च्या त्रैवार्षिक प्रक्रिये अंतर्गत प्राप्त झालेल्या निविदाधारकांपैकी कमी दराच्या निविदाधारकांसोबत संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.** | ठराव :- सदर प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करणेंत आली व असे ठरविण्यांत आले की, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात एकात्मीक किटक निर्मुलन व्यवस्थापन कार्यक्रम राबविणेसाठी मागविण्यात आलेल्या Request for Proposal (RFP) च्या द्विवार्षिक प्रक्रिये अंतर्गत प्राप्त झालेल्या मे. किरण कॉर्पोरेशन, मुंबई यांच्या सन २०१८-१९ ते सन २०१९-२० या द्विवार्षिक दरांना ही सभा मंजूरी देत असून सदर कामी कामाची संविदा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या पाटील सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| ९. | विरार (पू.) प्रभाग क्र. २३ मध्ये आर.जे.नगर (साईप्रभात) बिल्डींग पासून निराबाई संकूल पर्यंत गटारावर स्लॅब टाकणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. २१६ दि.०२/०५/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे.साई सिध्दी एंटरप्रायजेस ह्यांची ०.००% जास्त (अंदाजपत्रकीय दराची) निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. तरी मा. आयुक्तांच्या शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिकाचे कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.किशोर पाटील सूचक :- मा.श्री.दिलीप गोवारी**<br>**ठराव सर्वानुमते मंजुर** |
| १०. | विरार (पू.) प्रभाग क्र.२३ मध्ये विघ्नहर्ता संकूल ते गुरुदत्त नगर पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. २१४ दि. ०२/०५/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे. नेवाळकर एंटरप्रायजेस ह्यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. तरी मा. आयुक्तांच्या शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिकाचे कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री.किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ११. | प्रभाग समिती डी मधील वॉर्ड क्र.८३ मधील श्री. यशवंत अम्पायर ते शारदा अपार्टमेंट (रेल्वे समांतर) राज नगर येथील रस्ता खडीकरण करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुरीबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. ०८ दि. २२/०५/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे.सुधाकर दातीर यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दरापेक्षा ००.९९% कमी दराची निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. तरी मा. आयुक्तांच्या शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिकाचे कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री.वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १२. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती डी मधील वॉर्ड क्र.७८ मध्ये आचोळे तलाव गेट नं.२ ते अँकर पार्क येथील रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुरीबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. २९७ दि. २२/०६/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे.एस.एम.डेव्हलपर्स यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दराची निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. तरी मा. आयुक्तांच्या शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिकाचे कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अतुल साळुंखे सूचक :- मा.श्री.वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| १३. | **वसई विरार शहर महानगरपालिकेतील विविध विभागांतील संगणक, प्रिंटर व स्कॅनर देखभाल दुरुस्ती करणेकामी संगणकीय साहित्य (स्पेअर पार्टस) खरेदी करणेकामी एजन्सी नियुक्त करणेबाबत.** | **ठराव :-** सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेंत आली. प्राप्त परिस्थितीमध्ये प्रस्तावित कामांबाबत किती वेळा निविदा काढल्या त्याचा एकूण किती खर्च झाला. कुठल्या प्रभागात व विभागात कोणते साहित्य दिले त्यावर किती खर्च झाला या बाबतची अद्यावत माहिती पुढील स्थायी समिती सभेसमोर देण्यांत यावी. तोपर्यंत सदरचा विषय आजची सभा तहकुब ठेवत आहे. यास सभेने एकमताने मंजूरी दिली आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १४. | **वसई विरार शहर महानगरपालिका व वसई विकासनी संचालित वसई विकासीनी दृककला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १५ वी प्रत्यक्ष राज्यस्तरीय निसर्ग चित्रण स्पर्धेसाठी वित्तसहाय्य देणेबाबत.** | **ठराव** :- सदर विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली, प्रस्तावात वसई विरार शहर महानगरपालिका व वसई विकासनी संचालित वसई विकासीनी दृककला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने १५ वी प्रत्यक्ष राज्यस्तरीय निसर्ग चित्रण स्पर्धेसाठीचे आयोजन करणेंस व सबंधीतांस वित्त सहाय्य देणेकामी मंजुरी मिळणेबाबत प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे.वसई विरार शहर महानगरपालिका व वसई विकासनी संचालित वसई विकासीनी दृककला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने १५ वी प्रत्यक्ष राज्यस्तरीय निसर्ग चित्रण स्पर्धेचे आयोजनकामी होणाऱ्या खर्चावर महापालिकेचे नियंत्रण राहणार असून खर्चाच्या वेगवेगळ्या बांबी महापालिकेमार्फत मंजुर करुन खर्च करण्यांत येणार असल्याने संबंधीतांना वित्त सहाय्य न देता,खालील नमुद प्रमाणे कार्यवाही करणेंस ही सभा मंजुरी देत आहे.त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिका व वसई विकासनी संचालित वसई विकासीनी दृककला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने १५ वी प्रत्यक्ष राज्यस्तरीय निसर्ग चित्रण स्पर्धा आयोजित आयोजन करण्यांस व त्याकामी रुपये ४ लक्ष इतक्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.१५ वी प्रत्यक्ष राज्यस्तरीय निसर्ग चित्रण स्पर्धेसाठी लागणा-या आवश्यक बाबींचे तपशिलवार व बाजारभावाशी सुसंगत असे अंदाजपत्रक तयार करुन सदर बाबवार एकत्रित अंदाजपत्रक वसई विकासनी संचालित वसई विकासीनी दृककला महाविद्यालय यांचेमार्फत महानगरपालिकेस सादर करण्यांत यावे व त्या बाबवार एकत्रित अंदाजपत्रकानुसार महानगरपालिकेने वसई विकासनी संचालित वसई विकासीनी दृककला महाविद्यालय यांस करावयाच्या खर्चाची रक्कम महानगरपालिकेच्या कला-क्रीडा विभागाने आगाऊ स्वरुपात अदा करावी व अदा केलेल्या खर्चाचे विनियोग प्रमाणपत्र सादर करणे सदर मंडळास बंधनकारक राहील.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री.कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १५. | **वसई विरार शहर महानगरपालिका व वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळ (रजि.) यांच्या संयुक्त विद्यमाने २९ वा तालुका कला-क्रीडा महोत्सवाचे आयोजन करणेंस व सबंधीतांस वित्त सहाय्य देणेबाबत मंजुरी मिळणेबाबत.** | **ठराव** :- सदर विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली, प्रस्तावात वसई विरार शहर महानगरपालिका व वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळ (रजि.) यांच्या संयुक्त विद्यमाने २९ वा तालुका कला-क्रीडा महोत्सवाचे आयोजन करणेंस व सबंधीतांस वित्त सहाय्य देणेकामी मंजुरी मिळणेबाबत प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे. वसई विरार शहर महानगरपालिका व वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळ (रजि.) यांच्या संयुक्त विद्यमाने २९ वा तालुका कला-क्रीडा महोत्सवाचे आयोजनकामी होणाऱ्या खर्चावर महापालिकेचे नियंत्रण राहणार असून खर्चाच्या वेगवेगळ्या बांबी महापालिकेमार्फत मंजुर करुन खर्च करण्यांत येणार असल्याने संबंधीतांना वित्त सहाय्य न देता,खालील नमुद प्रमाणे कार्यवाही करणेंस ही सभा मंजुरी देत आहे. वसई विरार शहर महानगरपालिका व वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळ (रजि.) यांच्या संयुक्त विद्यमाने २९ वा कला-क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यांस व त्याकामी रुपये ५० लक्ष इतक्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. सदर कला क्रीडा महोत्सावासाठी लागणा-या आवश्यक बाबींचे तपशिलवार व बाजारभावाशी सुसंगत असे अंदाजपत्रक तयार करुन सदर बाबवार एकत्रित अंदाजपत्रक वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळ (रजि.) यांचेमार्फत महानगरपालिकेस सादर करण्यांत यावे व त्या बाबवार एकत्रित अंदाजपत्रकानुसार महानगरपालिकेने वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळ (रजि.) यांस करावयाच्या खर्चाची रक्कम महानगरपालिकेच्या कला-क्रीडा विभागाने आगाऊ स्वरुपात अदा करावी व अदा केलेल्या खर्चाचे विनियोग प्रमाणपत्र सादर करणे सदर मंडळास बंधनकारक राहील.<br>**अनुमोदक :- मा.श्री.उमेश नाईक सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

नगरसचिव

वसई-विरार शहर महानगरपालिका